MHKO070002822022

<u>नियमीत दिवाणी दावा क्र.४२/२०२२ मधील निशाणी क्र.३२ वर</u>

<u>आदेश</u>

**( श्री.चंदुलाल पुंजा पटेल –विरुध्द– श्रीमती मालन अंबूपे वगैरे )**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६ नियम १७ तसेच कलम १५१ व १५३ अन्वये दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.१ ते १५ यांनी त्यांची कैफियत निशाणी क्र.२६ वर दाखल केलेली आहे. तथापी संगणकीय टंकलेखन व हस्तदोषामुळे सदर कैफियतमध्ये काही किरकोळ संगणकीय टंकलेखनाच्या चुका निर्माण झालेल्या आहेत. त्या दुरुस्त न झाल्यास दावेकामी निष्कारण संदिग्धता निष्पन्न होणार आहे. कैफियत कलम १४ येथे प्रतिवादीच्या मिळकतीचे वर्णन करतेवेळी ''वादींनी दक्षिणेकडील बाजूस जाणे येणेकरीता वहिवाटीसाठी साधारण'' या ओळीतील ''वादींनी'' या शब्दाऐवजी ''प्रस्तुत प्रतिवादींनी'' असा शब्द दुरुस्त करणे आवश्यक आहे. तर कैफियत कलम १९ मध्ये चौथ्या ओळीतील प्रतिवादी व वादी या शब्दांमध्ये ''यांनी'' हा शब्द घालणे आवश्यक आहे. जेणेकरुन अधिक स्पष्टता येईल व संदिग्धता राहणार नाही. करिता सदरची दुरुस्तीस परवानगी मिळावी या करिता प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सदरचा दोष हा संगणकीय टंकलेखनाचा दोष असून टायपोग्राफिक एरर स्वरुपाचा आहे. सदर दुरुस्तीने वादी यांचे कोणतेही व कसलेही नुकसान

होणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीने प्रतिवादी कोणतीही नवीन केस तयार करत नाही. केवळ कैफियतीच्या मजकूरात सुसूत्रता व संलग्नता यावी जेणेकरुन गैरअर्थ काढण्यास वाव राहू नये हा हेतू त्यामागे आहे. अर्ज मंजूर न झाल्यास प्रतिवादी यांचे मोठे पैशात न भरुन येणारे नुकसान होणार आहे. दावा मिळकत ही वादी यांची स्वतःची असलेची केस नाही. दावा गुणदोषावर चालण्याच्या दृष्टीने व पुढील गुंतागुंत टाळण्याच्या दृष्टीने सदर दुरुस्ती मंजूर होणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीने कैफियतीचे स्वरुप बदलत नाही अथवा नवीन कथने प्रतिवादी करत नाहीत. करीता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादी यांनी केली आहे.

**०३.** वादी यांनी त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जावर दाखल करुन प्रस्तुत अर्जातील सर्व कथने नाकारली व प्रस्तुतचा अर्ज खर्चासहीत नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली. उभयतांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद श्रवण केला. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द हक्कज्ञापनाकरीता, कायम मनाईकरीता व आज्ञार्थी मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.२६ येथे त्यांची कैफियत दाखल केलेली आहे. सदर कैफियतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की प्रतिवादी यांनी कैफियत कलम १४ मध्ये ''वादींनी'' या शब्दाऐवजी ''प्रस्तुत प्रतिवादींनी'' तसेच कैफियत कलम १९ मध्ये चौथ्या ओळीतील प्रतिवादी व वादी या शब्दांमध्ये ''यांनी'' हा शब्द घालणेबाबत दुरुस्तीची मागणी केली आहे. दाव्याचे स्वरुप व प्रस्तावीत दुरुस्ती लक्षात घेता सदरची चुक ही केवळ टंकलेखनाच्या चुकीमुळे व अनावधानाने झाल्याचे दिसून येते. प्रस्तावीत दुरुस्ती ही औपचारिक स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याच्या

स्वरुपात व कारणात कोणताही बदल होणार नाही. तसेच वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रस्तावीत दुरुस्ती दाव्याच्या न्यायनिर्णयासाठी आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तावीत दुरुस्ती मंजूर करणे न्यायोचीत होईल. त्याकरिता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**– आदेश –**

१. प्रस्तुत अर्ज (निशाणी २८) रक्कम रु.२००/- इतका खर्च न्यायालयात भरण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तावीत दुरुस्ती पुढील तारखेस किंवा त्यापूर्वी करावी व आवश्यक ती पूर्तता करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ROHINI ASHOK JADHAV
Date: 2023.02.10 11:46:39 +0530

दिनांक –१०/०२/२०२३
जयसिंगपूर.

(**रोहिणी अ. जाधव**)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),
जयसिंगपूर.